# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

---

**परिपत्रक क्र. १२०/२०२०**

**विषय :— सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम सत्र/अंतिम वर्षातील अभ्यासक्रमांच्या परिपत्रक क्र. ११९/२०२० मध्ये नमूद केल्यानुसार परीक्षा न देवू शकलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे फेर आयोजनाबाबत..**

अंतिम वर्षातील नियमित, अनुशेषित व रिपीटर्स विद्यार्थी, बहिस्थ अभ्यासक्रमातील द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांची परीक्षा दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० पासून घेण्यात आली. तांत्रिक व इतर सर्व कारणांसाठी परीक्षे दरम्यान अडचणी आलेल्या विद्यार्थ्यांकडून गुगल फॉर्म भरून घेण्यात आलेला आहे. या परीक्षेस विविध कारणांमुळे काही विद्यार्थी अनुपस्थित राहिलेत, या सर्व बाबींचा विचार करून अशा विषयांच्या पूर्न:परीक्षेचे आयोजन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२० ते ०७ नोव्हेंबर, २०२० या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने करण्याचे निश्चित केलेले आहे. या परीक्षांचे वेळापत्रक खालीलप्रमाणे लावण्यात येत आहे :—

| अ.क्र. | अभ्यासक्रम | परीक्षेची तारीख |
|---|---|---|
| १. | शिक्षणशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, मानसनिति व समाजविज्ञान आणि शारिरीक शिक्षण अभ्यासक्रम | ०५ नोव्हेंबर २०२० |
| २. | वाणिज्य, व्यवस्थापन व विधी अभ्यासक्रम | ०६ नोव्हेंबर २०२० |
| ३. | कला व विज्ञान अभ्यासक्रम | ०७ नोव्हेंबर २०२० |

ही परीक्षा ऑनलाईन पध्दतीने सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० या वेळेत घेण्यात येईल. ऑफलाईन पर्याय निवडलेल्या ज्या विद्यार्थ्यांनी त्यांचेकडे मोबाईल, लॅपटॉप, कॉम्पुटर किंवा टॅब यापैकी कुठलीही सुविधा ऑनलाईन परीक्षा देणेसाठी उपलब्ध नाही त्यांनी आपापल्या महाविद्यालयात किंवा जवळच्या महाविद्यालयात जाऊन त्या महाविद्यालयाकडे उपलब्ध संगणक कक्षातील सुविधा वापरुन संबंधित विषयांची ऑनलाईन पध्दतीने परीक्षा द्यावी.

मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रकाचा आशय विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावा.

(महेश काकडे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा—समन्वय/४०५
दिनांक : ०२/११/२०२०